


■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 81 ■ गुरूवार,01 मे 2025 ■ RNI NO.-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

दैनिक

# आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com



**पैसे घेता मग सुविधा का देत नाहीत?**

>> सविस्तर वृत्त पान ४

# ओमराजे : ३ पिढ्यांपासून ऐकतोय, पाणी कधी येणार ते सांगा,

# राणा पाटील : ३५ वर्षापूर्वीची परिस्थिती बदलली, अभ्यास करा



## पाणी पेटले; खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या आक्रमक भूमिकेनंतर आमदार राणा पाटील यांचेही सडेतोड उत्तर

आरंभ मराठी । धाराशिव

**जलव्यवस्थापन कृती पंधरवडा समारोप कार्यक्रमात पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या समोरच खासदार ओमराजे आणि आमदार राणा पाटील यांनी आपापल्या भाषणातून एकमेकांवर कुरघोडी करत टीका केली. ओमराजे यांनी कृष्णा मराठंवाडा सिंचन प्रकल्पावरून टीका करताना आमच्या जिल्ह्याच्या तीन पिढ्या गेल्या तरी पाणी आले नाही अशी टीका केली. या प्रकल्पाच्या कामात बेड्या घालून हे काम थांबवण्याचे काम काही महाभागांनी केले, परंतु महाविकास आघाडीचे सरकार असताना आम्हीच या प्रकल्पाचा प्राधान्यक्रम बदलून कामाला गती दिल्याचे सांगितले. तर आमदार राणा पाटील यांनी खासदार ओमराजे यांना आक्रमक व मुद्देसुद पध्दतीने प्रत्युत्तर दिले.**

## शासकीय कार्यक्रमात पालकमंत्र्यांसमोरच सिंचन प्रकल्पावरुन आमदार-खासदार भिडले

तुळजापूर तालुक्यातीलच पाणी उचलून रामदरा तलावात टाकून पाणी आल्याचे सांगणाऱ्या लोकांनी नेमके हे पाणी कधी येणार हे एकदाचे सांगून टाकावे असा सवाल ओमराजे यांनी राणा पाटील यांना नाव न घेता विचारला. याला आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी चोख उत्तर देत ३५ वर्षांपूर्वी जिल्ह्यातील साखर कारखान्यांची संख्या आणि ऊसाचे क्षेत्र किती होते आणि आता किती आहे याचा अभ्यास करावा आणि जलसिंचनाचे काम जिल्ह्यात झाले आहे की नाही, याचे उत्तर शोधावे, असा टोला हाणला. मराठवाडा कृष्णा सिंचन प्रकल्पामध्ये आडकाठी आणणाऱ्या झारीतील शुक्राचार्यांनी आडकाठी आणण्याचे कितीही प्रयत्न केले तरी येणाऱ्या पावसाळ्यात हे पाणी येणारच असा दावा राणा पाटील यांनी यावेळी केला. यावेळी आमदार राणा पाटील यांनी पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता यांना समोर बोलावून पाणी कधी येणार हे सर्वांना सांगा असे म्हटले. यावर अधीक्षक अभियंता यांनी पाणी ऑगस्ट महिन्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्ह्यातील तेरणा, सीना, बेनितुरा, बोरी आणि मांजरा या नद्यांच्या पाण्याचे जलपूजन केले. तसेच यावेळी उपस्थित सर्वांना जलप्रतिज्ञा दिली. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी प्रास्ताविक करताना जलतारा उपक्रमाचे कौतुक करून यामुळे पाणीपातळीत वाढ होईल, असे सांगितले. येणाऱ्या पावसाळ्यात वृक्ष लागवडीचा मोठा उपक्रम राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार कैलास पाटील यांनी ठिबक सिंचन अनुदानाचे थकीत पैसे तात्काळ देण्यासाठी पालकमंत्री यांनी प्रयत्न करावेत,अशी विनंती केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्ह्यात पाण्याच्या बाबतीत जे प्रश्न समोर येतील ते पालकमंत्री म्हणून सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी पाटबंधारेमंत्री म्हणून जिल्ह्यात बरीच कामे केली आहेत. परंतु, पाण्याची गरज वाढत असल्यामुळे या क्षेत्रात अजून काम करावे लागणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला पालकमंत्री प्रताप सरनाईक, खासदार ओमराजे निंबाळकर, मित्रचे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील, आमदार कैलास पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव,पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता, शिवसेना जिल्हाप्रमुख सूरज साळुंखे यांची उपस्थिती होती.



## माकडाचा हैदोस, वृद्ध महिलेवर जीवघेणा हल्ला

आरंभ मराठी । मोहा

कळंब तालुक्यातील मोहा गावातील प्रसिद्ध दर्गाह परिसरात माकडाच्या वाढत्या उपद्रवामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दोन दिवसांत माकड चावल्याच्या तीन घटना घडल्याने गावकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विशेषतः बुधवारी घडलेली घटना अधिकच धक्कादायक ठरली. गावातील गंगुबाई रामलिंग भोंडवे या दर्गाहमध्ये गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या हातात असलेल्या पिशवीसाठी माकडाने झटापट सुरू केली. झटापटीत माकडाने त्यांच्या चेहऱ्याजवरील कानासमोरील भागावर चावा घेतला. ही घटना इतकी गंभीर होती की गंगुबाई यांना तात्काळ उपचारासाठी कळंब येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या प्रकृतीची स्थिती चिंताजनक असल्याचे समजते. या घटनेनंतर परिसरात एक प्रकारची भीती आणि अस्वस्थता पसरली आहे. गेल्या काही दिवसांपासून माकडाचा वावर दर्गाह परिसरात सातत्याने वाढत आहे. स्थानिक ग्रामस्थांनी माकडांकडून अन्नपिशव्या हिसकावणे, अंगावर धावून येणे, लहान मुलांना घाबरवणे अशा प्रकारच्या तक्रारी अनेकदा केल्या आहेत. मात्र बुधवारी घडलेली जीवघेणी घटना ही मोहा गावासाठी चिंताजनक ठरली आहे. ही गंभीर बाब लक्षात घेत आरंभ मराठीचे प्रतिनिधी तात्काळ दखल घेत वनविभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वनविभागाचे कर्मचारी भैरवनाथ जाधव आणि के.डी. जाधव यांनी मोहा गावातील दर्गाह परिसरात भेट देऊन पाहणी केली. मात्र, पाहणी दरम्यान माकड प्रत्यक्षात आढळून आले नाही. तरीही वनविभागाने परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, माकड दिसल्यास तात्काळ विभागाशी संपर्क साधण्याचे निर्देश दिले आहेत. या पाहणीवेळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच बशारत मोमीन, सदस्य संजय मडके, बाळासाहेब मडके आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी वनविभागाशी संवाद साधून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली.





### वनविभागाची तत्परता

मोहा गावात माकड चावल्याच्या घटनेनंतर वनविभागाने तात्काळ प्रतिसाद देत घटनास्थळी भेट दिली. कर्मचाऱ्यांनी परिसराची पाहणी करून नागरिकांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले. माकड दिसल्यास त्वरित माहिती देण्याचे आवाहनही करण्यात आले. ही कृती वनविभागाच्या तत्परतेचे स्पष्ट उदाहरण ठरली.

### कुत्र्यांचा त्रासही वाढतोय लहान मुलं आणि वृद्धांचे हाल

माकडांबरोबरच गावात कुत्र्यांचाही त्रास प्रचंड वाढला आहे. अनेक ठिकाणी कुत्र्यांनी लहान मुलांवर आणि शाळा–महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच शेतात जाणाऱ्या – येणाऱ्या शेतकऱ्यांवर हल्ले केल्याच्या तक्रारी आहेत. काही घटनांमध्ये कुत्रे चावल्यामुळे नागरिकांना औषधोपचारासाठी कळंब येथे जावे लागले आहे.



संग्रहीत छायाचित्र

## तुळजापूर तालुक्यात तीन बालविवाह रोखले

आरंभ मराठी । धाराशिव

अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर गुपचूप होत असलेल्या तुळजापूर तालुक्यातील तीन गावातील तीन बालविवाह रोखण्यात महिला व बालविकास विभागाला यश आले. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दोनच दिवसांपूर्वी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर पालकांनी बालविवाह करू नये असे आवाहन केले होते. तसेच बालविवाह होत असतील तर त्यावर लक्ष ठेवावे अशा सूचना प्रशासनाला दिल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी तीन बालविवाह रोखण्यात यश आले. चाईल्ड हेल्प लाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकाच्या मदतीने हे तीन बालविवाह रोखण्यात आले. यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे व जिल्हा समन्वयक विकास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी करण्यात आली. यामध्ये बाल संरक्षण कक्षाच्या प्रज्ञा बनसोडे (सामाजिक कार्यकर्ता) तसेच चाईल्ड हेल्प लाईन कक्षातील वंदना कांबळे (समुपदेशक), अभय काळे (केस वर्कर), योगेश माने (केस वर्कर) तसेच ग्रामसेवक, पोलीस, अंगणवाडी सुपरवायजर, अंगणवाडी सेविका, सरपंच व गाव ग्राम बाल संरक्षण समिती यांच्या समवेत प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन बाल विवाह प्रतिबंध केले. तसेच यातील पालकांचे समुपदेशन केले व त्यांच्याकडून हमीपत्र लिहून घेतले.



## माडज येथे घरफोडी; सव्वा लाखांचा ऐवज लुटला

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यातील माडज येथे चोरट्यानी घरफोडी करत सव्वा लाखांचा ऐवज लुटून नेला. फिर्यादी अज्ञान गोविंद पाटील, (वय ६० वर्षे, रा. माडज) यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचा कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दिनांक २७ एप्रिल रोजी रात्री तोडून आत प्रवेश केला. चोरट्यानी घरातील स्टिलच्या डब्यातील २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम ६२,००० रुपये असा एकुण १,२९,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अज्ञान पाटील यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## .. तर आठ दिवसांत रस्त्यासाठी फेरनिविदा काढणार

**पालकमंत्री सरनाईक यांच्या आश्वासनानंतर महाविकास आघाडीचे उपोषण मागे**

आरंभ मराठी । धाराशिव

शहरातील कचरा डेपो स्थलांतरित करण्यासाठी आणि १४० कोटींच्या रस्त्याच्या कामाच्या मागणीसाठी धाराशिवमध्ये शिवसेनेचे (उबाठा गट) शहरप्रमुख सोमनाथ गुरव, युवा सेनेचे रवी वाघमारे यांच्यासह काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सुरू केलेले आमरण उपोषण तिसऱ्या दिवशी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या आश्वासनानंतर बुधवारी दुपारी मागे घेण्यात आले. सरनाईक यांनी शहरातील रस्त्याचे काम निविदेनुसार करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला आठवड्याची मुदत देण्यात येईल, त्यानंतर फेरनिविदा काढण्यात येईल, कचरा डेपो स्थलांतरित करण्यासाठी तातडीने पावले उचलण्यात येतील, असे आश्वासन दिले. त्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील रस्त्यांच्या १४० कोटींच्या कामासाठी निविदा मंजूर करण्यात आली असून, ही निविदा १७ कोटींनी अधिकची असल्याने यात पालिकेचे पर्यायाने शहरातील नागरिकांचे नुकसान होणार असल्याने निविदेतील मूळ किमतीनुसार निविदा मंजूर करावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच शहरात असलेला कचरा डेपो शहराबाहेर स्थलांतरित करावा,या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू करण्यात आले होते. बुधवारी उपोषणाचा तिसरा दिवस होता. अखेर पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन आश्वासन दिले.त्यानंतर उपोषण मागे घेऊन आले.

## मुळेवाडी येथे एकाच रात्री सहा घरे लुटली

आरंभ मराठी । ढोकी

धाराशिव तालुक्यातील मुळेवाडी येथे चोरट्यानी एकाच रात्री सहा घरी चोरी करून अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली. यासंबधी सविस्तर बातमी अशी की, दिनांक २९ एप्रिल रोजी रात्री चोरट्यानी फिर्यादी दत्तात्रय बळीराम मुळे यांच्यासह त्यांच्या शेजारी राहणारे बाळासाहेब कन्हेरे, कौशल्या मारवडकर, प्रशांत मुळे, मधुकर कन्हेरे, त्रंबक कन्हेरे यांच्या घरी चोरी केली. चोरट्यानी घरातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकुण २,१२,००० रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. दत्तात्रय मुळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (४),३०५ (अ)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.



**वैशाख वणवा!**

## पुढील पाच दिवस उष्णतेची तीव्र लाट; काळजी घेण्याचे आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव

मागील आठवड्यात वादळी वारे आणि काही भागात हलका पाऊस पडल्याने वातावरणात काही प्रमाणात गारवा निर्माण होऊन तापमान काही अंशी खाली आल्याने उष्णतेपासून काही काळ सुटका झाली होती. परंतु, मे महिन्याच्या सुरुवातीलाच धाराशिव जिल्ह्याला वैशाख वणव्याला तोंड द्यावे लागणार आहे. पुढील पाच दिवस धाराशिव जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट येणार आहे. त्यामुळे ५ मे पर्यंत नागरिकांना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. सध्या धाराशिव शहर आणि जिल्ह्याचे तापमान ४२ अंश सेल्सिअस असून, पुढील चार दिवसात या तापमानात दोन ते अडीच अंशाची वाढ होऊन वैशाख वणवा सहन करावा लागणार आहे. सध्या उष्णतेने अंगाची ल्हाई ल्हाई होत असून, याचा सर्वाधिक त्रास लहान मुलांना होत आहे. मुले तापाने फनफनू लागली असून, जिल्हा प्रशासनाने देखील नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन उष्माघाताचा धोका वाढला असल्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णालयात उष्माघात कक्ष तयार करण्यात आला आहे. वाढत्या उष्णतेचा धोका माणसाप्रमाणेच पशु पक्षांना देखील होत असल्यामुळे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गालगत शंभर पानवठ्याची सोय जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे.



### ५ तारखेपर्यंत उष्णतेचा धोका

अरबी समुद्रात सध्या उच्च दाबाची स्थिती आहे. त्याच वेळी अति उष्ण वारे आखाती देशांतून राजस्थानमार्गे भारतात येत आहेत. समुद्रावरील बाष्पयुक्त वारे जमिनीवर येण्यास अडथळा येत आहे. समुद्रात जोपर्यंत एखादी चक्राकार स्थिती निर्माण होत नाही, तोपर्यंत तापमान अधिक वाढत राहील. ४ मे पर्यंत तापमान ४५ ते ४६ अंश डिग्री सेल्सिअस पार करेल अशी शक्यता आहे. आवश्यक काम असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे. ५ मे रोजी एखादी चक्राकार स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यावेळी तापमान काही प्रमाणात कमी होईल असा अंदाज आहे.

**–सुरज जयपाल जाधव**
**हवामान अभ्यासक, रुईभर.**

## अणदूर येथील विवाहितेची आत्महत्या; पती आणि सासूवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी । नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्या प्रकरणी पती आणि सासूवर नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, स्वाती प्रविण कांबळे (वय ३२ वर्षे, सिध्दार्थ नगर, अणदूर) या विवाहित महिलेने दिनांक २७ एप्रिल रोजी रात्री अकरा वाजता राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केली. याप्रकरणी आरोपी पति प्रविण शाम कांबळे सासू आरती शाम कांबळे यांच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वाती हीला सतत शिवीगाळ करुन तसेच मारहाण करुन मानसिक त्रास दिल्याने त्यांच्या त्रासाला कंटाळुन स्वाती हिने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी फिर्यादी पदमीणी अशोक कांबळे (वय ५० वर्षे, रा. सिध्दर्थ नगर, अणदुर)यांनी दिनांक २९ एप्रिल रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम–१०८,११५(२), ३५२, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## जागतिक कामगार दिन

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या कायद्याने आठ तासांचा दिवस, लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी, महिला कामगारांच्या कामावर मर्यादा, रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम, कायद्याने साप्ताहिक सुट्टी, कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा, समान कामासाठी समान वेतन या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बाँब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, '' कामगार – कामगारात, राष्ट्रा – राष्ट्रात, धर्मा – धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते.'' लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# खोट्या दिखाव्याऐवजी, खऱ्या समाधानाचा शोध

आज प्रत्येकजण सोशल मीडियावर सक्रिय आहे. आज प्रत्येक व्यक्तीचा ऑनलाइन राहण्याचा सरासरी वेळ पाहिला तर तो पाच तासांपर्यंत पोहोचतो. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामवर अनेकजण आपली मते व्यक्त करताना दिसतात. कोणी रील्स तयार करतो, तर कोणी आपल्या कार्यक्रमांचे, प्रवासाचे, किंवा कधीकधी खरे–खोटे समाजकार्य दाखवणारे फोटो शेअर करून प्रतिष्ठा मिळवण्याचा प्रयत्न करतो. आपण आनंदी, समाधानी आणि सुस्थितीत आहोत, हे दाखवण्याचा आटोकाट प्रयत्न आज लोक करत आहेत.पण खरंच प्रत्येक व्यक्ती शाश्वत सुखी, समाधानी आणि तणावमुक्त आहे का? दुर्दैवाने, उत्तर ''नाही'' असेच द्यावे लागते.




आज तरुण विद्यार्थी करिअरच्या बाबतीत प्रचंड तणावात आहेत. ''माझं भवितव्य काय?'' या प्रश्नाने ते बेचैन झाले आहेत. करिअरची चिंता त्यांना अस्वस्थ करत आहे. काही नव तरुणांना पैसा आणि उच्च जीवनशैलीचं वेड लागलं आहे. ती मिळत नाही, म्हणून त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात असमाधान वाढत आहे. हे असमाधान झाकण्यासाठी अनेकजण सोशल मीडियाचा आधार घेत आहेत. ''मी सर्वस्वी सुखी आहे'', ''मला काहीच कमी नाही'', ''माझ्यासारखा मीच!'' हे दाखवण्यासाठी लोक सोशल मीडियावर आपली वेगवेगळी रूपं उभी करत आहेत.

भूतकाळातील कटू आठवणी आणि भविष्याच्या चिंतेत गुरफटून आपण वर्तमानातील हलक्या–फुलक्या आनंदाच्या क्षणांना मुकतो आहोत. चाळिशीनंतर अनेकांना आपल्या मुलांच्या करिअरची चिंता सतावत आहे. स्पर्धेने ग्रासलेले जग पाहता, ''माझा मुलगा या स्पर्धेत टिकेल का?'' या प्रश्नाने पालक अस्वस्थ होतात. आपले मन सतत भूतकाळ आणि भविष्यकाळ यामध्ये हेलकावत राहत आहे. मनशांती हरवली आहे. आणि तरीही, आपण बेचैन असल्याचे जगाला कळू नये, यासाठी आपण खोटा बिनधास्तपणा दाखवत आहोत.

आज आपण जीवनभर धावत आहोत, पण हाती काय लागते? आपल्या जवळच्या लोकांसोबत वेळ घालवण्याची संधीही आपण गमावतो. जीवनाच्या शेवटी अनेकांना वाटते, ''आपलं आयुष्य खरं तर आपल्या मनासारखं जगलोच नाही.'' आपली आवड, छंद जोपासता आले नाहीत याचा पश्चाताप उशिरा होतो.आज वैद्यकीय क्षेत्रात जरी प्रगती झाली असली, तरी मानसिक आजार, असमाधान, राग, थकवा हे मनातून उद्भवणारे आजार वाढले आहेत. आपल्या आजूबाजूला अनेक आनंददायी क्षण घडत असतात, पण आपण त्यात सहभागी होत नाही, कारण ''आपल्याला वेळ नाही''. काहींना ''बिझी'' असणं अभिमानास्पद वाटतं!

म्हणून, खोट्या समाधानाचा दिखावा न करता, खरे समाधान शोधण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. तो अर्थातच निसर्गातून आणि जवळच्या व्यक्तींकडूनच मिळेल.उगवणारा आणि मावळणारा सूर्य, सकाळचे किलबिलाट करणारे पक्षी, रात्रीचे किरकिर करणाऱ्या कीटकांचे आवाज यामध्येही आनंद लपलेला आहे. पाच–दहा पानांचे वाचन, भरभरून लेखन, मैदानावर खेळणे, सायकलवर फिरणे हे क्षण खरंच समाधान देणारे असतात. उन्हाळ्यात पाण्यात डुंबणे आणि थंडीत शेकोटीपाशी गप्पा मारण्यात वेगळाच आनंद आणि समाधान आहे.



**किशोर जाधव**
मो. ९९२२८८२५४१
सोलापूर

सोशल मीडियावरील खोट्या पोस्टवर मिळणाऱ्या बनावट लाईक्स आणि कमेंट्सपेक्षा खरे, शाश्वत समाधानच अधिक मूल्यवान आहे.

कबीरजी म्हणतात,
चाह गई, चिंता मिटी
मनवा बेपरवाह
जाको कछु न चाहिए
वो शाहन का शाह।।

जीवनात कोणत्याच गोष्टीची अपेक्षा न करणारा हाच राजासारखं जीवन जगू शकतो.कारण जीवनात आपण सतत कोणत्या ना कोणत्या तरी मृगजळा मागे धावत असतो.अमके झाले की मग मी सुखी होइन. एवढ्याच पॅकेज मिळालं तर मी सुखी होईन... अमुक अमुक ठिकाणी माझं घर झालं,तर मी तेथे सुखा समाधानाने राहीन... मुलाचा नंबर योजलेल्या कोर्सला लागला तर मुलाची लाईफ बनेल.... अशी अनेक दिवास्वप्ने आपण रंगवत राहत असतो.खरंतर आयुष्य कधीच परफेक्ट नसते. अनिश्चितता आणि इम्परफेक्शन हा आयुष्याचा स्थायी भाव आहे. पण हे आपल्याला कळते पण वळत नाही तर बरेचदा कळतही नाही. यातूनच आपण नेहमी असमाधानी राहत असतो. चला, खोट्या दिखाव्याऐवजी खऱ्या समाधानातच धन्यता मानू या!

# CISCE बोर्ड काय आहे?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांची मुलगी दिविजा दहावीची परिक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली आहे. नुकताच सीआयएससीई बोर्डाने दहावीचा निकाल जाहीर केला. दिविजाने ९२ टक्के गुण मिळवले आहेत. अमृता फडणवीस यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ही बातमी सर्वांसोबत शेअर केली. तर आता आपण प्रश्न पडला असेल CISCE बोर्ड काय आहे? तर चला सविस्तर जाणून घेऊया या बोर्ड बद्दल माहिती. तसेच त्याची CBSE बरोबर तुलना करू या.



**प्रा. सोमनाथ लांडगे**
संचालक श्री साई श्रद्धा एज्युकेशन नीट ऑनलाइन टेस्ट सिरीज ॲडमिशन कौन्सलिंग
मो. ९४२२९४१९२९, ९४२०२७८२५८

CISCE (Council for the Indian School Certificate Examinations) आणि CBSE (Central Board of Secondary Education) ही दोन्ही भारतातील प्रमुख शैक्षणिक मंडळे आहेत. पुढे मी आपणास CISCE चे सविस्तर वर्णन आणि CBSE बरोबर त्याची तुलनात्मक माहिती देत आहे.

CISCE म्हणजे काय?

CISCE ही एक खाजगी राष्ट्रीय शैक्षणिक संस्था आहे, जी भारतात ICSE (Indian Certificate of Secondary Education – इ.१०वी) आणि ISC (Indian School Certificate – इ.१२वी) या परीक्षा आयोजित करते.

CISCE च्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी:

१. माध्यम: मुख्यतः इंग्रजी माध्यमावर भर दिलेला असतो. सर्व विषय इंग्रजीतून शिकवले जातात.
२. अभ्यासक्रम: तुलनेने विस्तृत, सखोल आणि संतुलित अभ्यासक्रम असतो. विज्ञान, कला, आणि व्यावसायिक विषयांचा समावेश असतो.
३. Internal Assessment: Internal project work आणि practicals ला खूप महत्त्व दिले जाते.
४. ICSE (१०वी): ६ विषय असतात – इंग्रजी, दुसरी भाषा, इतिहास, नागरिकशास्त्रात, भूगोल, गणित, विज्ञान, आणि एक निवडलेला विषय असे विषय असतात.
५. ISC (१२वी): तीन गट – विज्ञान, कॉमर्स, आणि आर्ट्स. Theory + Practical आधारित मूल्यांकन पद्धत वापरली जाते.
६. विद्यार्थ्यांची कौशल्ये: भाषिक कौशल्य, सर्जनशीलता, प्रकल्प–आधारित काम यावर भर.

CBSE बद्दल थोडक्यात:

१. सरकारी मंडळ: भारत सरकारने स्थापन केलेले शैक्षणिक मंडळ आहे.
२. सोप्या स्वरूपाचा अभ्यासक्रम: स्पर्धा परीक्षा (जसे NEET, JEE) यांच्याशी जुळणारा अभ्यासक्रम असतो.
३. अधिक शाळा: देशभर आणि परदेशातही CBSE शाळा मोठ्या संख्येने आहेत.
४. Internal Work कमी: CBSE ला Internal Work कमी तर theory वर आधारित जास्त शिक्षण ही पध्दत वापरलेली आहे.

CISCE व CBSE तुलना:

दोन्ही बोर्ड मध्ये थोडा आपण आता तुलनात्मक विचार करू या. मग साहजिकच आपल्याला प्रश्न पडेल कोणते बोर्ड चांगले आहे? तसा या दोन्ही बोर्डाच्या बाबतीत आपण तुलनात्मक विचार करत असताना प्रत्येकाची बाजू वेगवेगळ्या असू शकते. तर उत्तर हे पूर्णपणे तुमच्या उद्दिष्टांवर अवलंबून असू शकते.

१. जर तुमचे लक्ष NEET, JEE सारख्या स्पर्धा परीक्षा कडे असेल, तर उइडए अधिक उपयुक्त आहे.
२. जर तुम्हाला भाषेची सखोल समज, सर्जनशीलता, विदेशात शिक्षण किंवा समांतर कौशल्ये विकसित करायची असतील, तर CISCE (ICSE/ISC) चांगले आहे.

आपण आपले परिसरामध्ये बरेच विद्यार्थी स्टेट बोर्ड अर्थात एसएससी/ एचएससी बोर्ड यामधून आपण परीक्षा देताना बरेच वेळेस बघितलेले आहेत. काही विद्यार्थी सीबीएससी बोर्डातून परीक्षा देऊन पास होताना ही पाहत आहेत. आता आपणास या नवीन CISCE बोर्डा बद्दल सुद्धा बऱ्यापैकी ज्ञान प्राप्त झालेले असेल. आपल्या मुलाला भविष्यामध्ये कोणत्या गोष्टीवरती काम करायला लावणार आहात? त्यावर तुम्ही तुमच्या मुलाला कोणत्या बोर्डातून परीक्षेला बसवणार आहात? हे तुमच्यावरती अवलंबून आहे.

## नवोदय विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**आरंभ मराठी । तुळजापूर**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात मंगळवारी सांस्कृतिक सुरभी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले .या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन डॉ. सतीश कदम यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व सरस्वती पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी स्वाती सचिन पाटील, प्राचार्य अनिल डोके यांची प्रामुख्याने विशेष उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा सन्मान करून या कार्यक्रमाची प्रस्तावना व विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख सर्व पालकांच्या समोर सादर केला. याप्रसंगी जवळपास ६०० पालक याप्रसंगी उपस्थित होते .या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,नवोदय परिवार सर्व उपस्थित होते. या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भरतनाट्यम ,सोशल मीडिया नृत्य, इंग्लिश नाटक( जंक फूड) पंढरीची दिंडी, जुगलबंदी नृत्य ,मंगळागौर, हास्य जत्रा नाटक,साउथ इंडियन नृत्य, मूक अभिनय ,लावणी, अंधश्रद्धा निर्मूलन नाटक, सूर–ताल तरंग ,गोंधळ,समूहगीते सादर करून बालकलाकारांनी सर्व प्रेक्षकांची व पालकांची मने जिंकून घेतली. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. सतीश कदम या बाल कलाकारांचा बालविष्कार पाहून अचिंबित झाले. हे नवोदय म्हणजे स्वर्ग आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी येथील शिक्षक नेहमी तत्पर असतात. या विद्यालयातून बाहेर पडणारा विद्यार्थी एक उत्तम नागरिक म्हणून बाहेर पडत आहे त्याची जाण सर्व पालकांना आहे. बाल कलाकारांनी ज्या कला सादर केल्या. त्याची कला अशीच वृद्धिंगत होत राहो, अशा शुभेच्छा दिल्या. यासाठी संगीत अध्यापक पी एन जोशी ,सांस्कृतिक कार्यक्रम प्रभारी हरी जाधव, निषाद भुते यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईश शिंदे ,संस्कार भंडारे, कु. सपना थोरात, वैष्णवी डोंगरे या मुला मुलींनी केले. आभार प्रदर्शन वरिष्ठ अध्यापक सचिन खोब्रागडे यांनी केले.

## भूम येथील रविंद्र हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**आरंभ मराठी । भूम**

भूम येथील रवींद्र हायस्कूलच्या सन १९९७–९८ मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला शिक्षक, माजी विद्यार्थी आणि विद्यमान विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचा पुष्पगुच्छ व सत्कार करत मन:पूर्वक सन्मान केला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील जुन्या परंपरेप्रमाणे पहिला तास वर्गात भरवून झाली. जुनी घंटा वाजवून शाळेतील आठवणींना उजाळा देण्यात आला. विद्यार्थ्यांना क्षणभर वाटले, जणू काही ते पुन्हा शाळेत परतले आहेत. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

## पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा मुस्लिम समाजाच्या वतीने निषेध

**आरंभ मराठी । धाराशिव**

जम्मू काश्मिर येथील पहलगाम मधील भ्याड दहशतवादी हल्ल्याचा शहरातील मुस्लिम समाजाच्या वतीने निषेध व्यक्त करत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सरकारला निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे, धाराशिव शहरातील मुस्लीम समाज प्रतिनिधीक स्वरुपात एकत्र येवुन निवेदनाद्वारे जम्मू कश्मिर येथील पहलगाममधील भ्याड दहशतवादी हल्ला करुन अतिरेक्यांनी ज्या निष्पाप २६ लोकांचे बळी घेतले आहेत तसेच अनेक लोकांना जखमी केले आहेत त्या घटनेचा आम्ही तिव्र निषेध करीत आहोत.पहलगाममधील पर्यटकांवर झालेला भ्याड हल्ला हा पुर्वपदावर आलेल्या शांत काश्मिरीयतवर झालेला हल्ला आहे तिथल्या जीवन, रोजगार आणि देशाशी एकरुप होण्याच्या लोकांच्या भुमीकेरवरच हा हल्ला आहे. यावेळी मसूद शेख ,सज्ञायोद्दीन शेख ,पटेल मेहबूबपाशा , शेख अनवर, बाबा मुजावर ,बिलाल तांबोळी, वाजिद खान पठाण, शेख इस्माईल ,काझी एजास ,शेख अतिक, कादर खान, मैनोद्दीन पठाण, आयाज शेख,काझी मुज्जमील, फिरोज शेख, इमरान खान, गफूर शेख ,खलिफा कुरेशी, असद पठाण, ईस्माल शेख, फरमान काझी, जाखेरखॉ पठाण यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित नागरिकांच्या या निवेदनावर स्वाक्षरी आहेत.

## आजच्या ग्रामसभेत मनरेगा योजनेतून फळबाग करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांची नावे निश्चित करा

### जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्व ग्रामपंचायतींना सूचना

**आरंभ मराठी । धाराशिव**

आज महाराष्ट्र दिनानिमित्त प्रत्येक गावात होत असलेल्या ग्रामसभेत मनरेगा योजनेतून फळबाग करू इच्छिणाऱ्या शेतकरी बांधवांची नावे निश्चित करावीत आणि फळबाग लागवडीला प्रोत्साहन द्यावे अशा सूचना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना पत्र काढून दिल्या आहेत. धाराशिव जिल्ह्यातील कृषि हवामान फळबाग लागवडीसाठी अत्यंत अनुकुल आहे. राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत या वर्षी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना तसेच नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प योजनेतून फलोत्पादन क्षेत्रात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना सहभाग करुन देण्यासाठी महत्त्वपूर्ण नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व



सरपंचांनी आपल्या गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच त्यांच्या नावाचे ठराव वैयक्तिक लक्ष घालून आज होणाऱ्या ग्रामसभेत मंजुर करुन घ्यावेत. हे ठराव लेबर बजेटमध्ये समाविष्ट केल्यास गावातील शेतकऱ्यांना रोजगार निर्माण होण्याबरोबरच फलोत्पादन क्षेत्रातही प्रगती साधता येईल. असे पत्रात नमूद केले आहे. ग्रामपंचायतींच्या सहकार्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अधिक आर्थिक स्थैर्य देण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार असल्यामुळे सर्व ग्रामपंचायतींनी यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.


## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत मेंढा शाळेचे यश




**आरंभ मराठी । तेर**

महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ पुणे यांच्याकडून घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सन २०२४–२५ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंढा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमधील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी परीक्षेत पात्र झाले. यामध्ये असरफ फ रोज शेख, समृद्धी हनुमंत जावळे, समीक्षा नितीन घुले, अथर्व हरिराम ढोरमारे व प्रथमेश अमोल सगर हे विद्यार्थी या परीक्षेत पात्र झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशालेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद , शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत कार्यालय व पालक यांच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

## प्रतापराव ताकमोघे यांचे निधन



**आरंभ मराठी । तुळजापूर**

येथील देवीचे पुजारी व सेवानिवृत्त कर्मचारी प्रतापराव ताकमोघे (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी सकाळी दुःखद निधन झाले .त्यांच्यावर दुपारी मोतीझरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी नातवंडे आहेत. पत्रकार सचिन ताकमोघे यांचे ते वडील होत. अंत्यसंस्कार समयी विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

# तुळजापूर येथील जुन्या बसस्थानकाच्या नूतन इमारतीचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते उद्घाटन

**आरंभ मराठी । धाराशिव**

आई तुळजाभवानीच्या कृपेने मी एसटी महामंडळाचा अध्यक्ष झाल्यानंतर माझ्या हस्ते पहिलेच उद्घाटन तुळजापूर बसस्थानकाचे व्हावे, हे माझं भाग्य समजतो आणि अशाच प्रकारची सुसज्ज बसस्थानके राज्यभरात उभारण्याचा आम्ही प्रयत्न करू अशी ग्वाही परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

तुळजापूर येथील जुन्या बसस्थानकाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी मित्राचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजीतसिंह पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव,अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना, एस टी च्या नाशिक विभागाच्या उपमहाव्यवस्थापक अमृता ताम्हणकर व विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. सरनाईक यावेळी म्हणाले की, मी मंत्री झाल्यापासून सर्वसामान्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी मी एसटीतून प्रवास केला, त्यांच्याशी प्रत्यक्ष बोललो यातून मला त्यांचे प्रश्न समजले.आज दररोज सरासरी ५५ लाख प्रवासी एसटीच्या सेवेचा लाभ घेत आहेत.त्यांना सुरक्षित आणि वक्तशीर सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत त्यामुळे भविष्यात चांगली बसस्थानके







निर्माण करून तेथे महिला व पुरुषांसाठी स्वच्छ प्रसाधनगृहे,सुसज्य प्रवासी प्रतीक्षालये तयार करणे व ती सातत्याने स्वच्छ राहतील यासाठी देखभाल यंत्रणा ठेवणे हे देखील महत्त्वाचे असणार आहे. या उद्घाटन प्रसंगी अनेक नागरिक, प्रवासी व एसटीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव बसस्थानकाला देणार

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे अवघ्या महाराष्ट्राचे आदर्श आहेत.त्यांचे नाव तुळजापूर बसस्थानकाला आणि धाराशिव बसस्थानकाला देण्यात येईल असे आश्वासन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिले.

### अत्याधुनिक रुग्णालय लवकरच जनतेच्या सेवेसाठी

पालकमंत्री सरनाईक पुढे म्हणाले की,तुळजापूर येथे महाराष्ट्र शासन आणि श्री.तुळजाभवानी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने १०० खाटांचे अत्याधुनिक असे मल्टीस्पेशलिटी रुग्णालय उभारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून सर्व रुग्णांना मोफत उपचार करण्यात येणार आहेत.त्यामुळे तुळजापुर व परिसरातील सर्व सामान्य जनतेची सेवा करण्याचे भाग्य या माध्यमातून आई तुळजाभवानी आम्हाला दिले आहे, त्याबद्दल मी शतशः ऋणी आहे.

---

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078

# मराठा सेवा संघाच्या वतीने मुरुम शहरात महात्मा बसवण्णा जयंती उत्साहात साजरी

## शहर व परिसरात विविध ठिकाणी जयंती सोहळ्याचे आयोजन



आरंभ मराठी । मुरूम

**बाराव्या शतकात आंतरजातीय विवाह घडवून आणत समता, बंधुता आणि माणुसकीचा संदेश देणारे परिवर्तनवादी संत महात्मा बसवण्णा यांची जयंती बुधवारी (ता. ३०) रोजी मराठा सेवा संघाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवण्णा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी माजी नगरसेवक चंद्रशेखर मुदकन्ना, सहाय्यक पोलीस निरीक्षक डीडी गव्हाणे, किसान ब्रिगेडचे अध्यक्ष भगत माळी, टिपू सुलतान ग्रुपचे अध्यक्ष बाबा कुरेशी, बसवेश्वर युवक मंडळाचे दत्ता हुळमजगे आदी मान्यवर उपस्थित होते. मुरुम शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बसव प्रतिष्ठानच्या वतीने तसेच महात्मा बसवेश्वर चौक येथे महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने महात्मा बसवण्णा यांची जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.**

यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे यांनी महात्मा बसवण्णा यांच्या जीवनकार्यावर सविस्तर आणि प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. ''महात्मा बसवण्णा हे केवळ एक संत नव्हते, तर परिवर्तनवादी विचारांचे महान अध्वर्यू होते. त्यांनी बाराव्या शतकात जातीव्यवस्थेच्या जाचक विळख्याला छेद देत माणुसकीची मशाल उंचावली. त्यांचे विचार आजच्या समाजालाही मार्गदर्शक ठरतात. बसवण्णांनी स्थापन केलेल्या बसव अनुभव मंटपात सर्व जाती-धर्मांतील लोकांना एकत्र आणून विचार मांडण्याची, चर्चा करण्याची आणि निर्णय घेण्याची संधी दिली. हीच खरी लोकशाही होती. ते एक आदर्श समाज रचू पाहत होते, जिथे माणूसपण हेच खरे मूल्य असेल.आज आपण त्यांच्या जयंती निमित्त एकत्र आलो आहोत, हे आपल्या समाजात अजूनही परिवर्तनाची, समतेची आणि विवेकशीलतेची गरज आहे, हे दाखवते. बसवण्णांचे कार्य केवळ अभिवादनापुरते मर्यादित न राहता, त्यांच्या विचारांची जाणीवपूर्वक अंमलबजावणी व्हावी,



हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल.''

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन जाधव यांनी केले. प्रास्ताविक किरण गायकवाड तर आभार प्रदर्शन लखन भोंडवे यांनी केले.यावेळी आप्पासाहेब बिराजदार, कमलाकर मोटे, बालाजी टीकांबरे, मेघराज लादे, राहुल वाघ, हारून जेवळे, सिद्धलिंग हिरेमठ, विलास चिलोबा, हिरेमठ गुरुजी, मिरगाळे गुरुजी, नहिरपाशा मासूलदार, गणेश वाकळे, अल्ताफ जेवळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष श्रीधर इंगळे, गणेश कडगंचे, सागर धुमुरे, मारुती कदम, संजय सावंत यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अणदूर शिवारात अडीच लाखांची चोरी; तिघांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी । नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील अणदूर शिवारात शेतातील सोयाबीन, ज्वारी आणि मोटारसायकल असा अडीच लाख रुपये किंमतीचा माल चोरून नेल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी अजिंक्य दिपक घोडके (वय २३ वर्षे, रा.समर्थ नगर, अणदुर ता. तुळजापूर) यांचे नळदुर्ग शिवारातील सर्वे नं २०२ मधील सोयाबीनचे १०० पोते, ज्वारीचे १० पोते व होंडा युनिकॉर्न लाल रंगाची मोटरसायकल (क्र एमएच २५ बी.सी.२६०२) असा एकुण अंदाजे २,५०,००० रुपये किंमतीचा माल हा आरोपी प्रमोद राजाराम हराळे (रा. भोसे ता. मिरज जि. सांगली), संजय सुरेश चौगुले (रा. अणदुर) आणि बालाजी बाळाराम पारधे (रा. खुदावाडी ता. तुळजापूर) यांनी दिनांक २९ एप्रिल रोजी चोरून नेला.अजिंक्य घोडके यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे तिघांवर भा.न्या.सं.कलम ३०६, ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त अभिवादन



आरंभ मराठी । तुळजापूर

बाराव्या शतकातील क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त येथील श्री वीरशैव जंगम मठात कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी,धीरज पाटील, गोकुळ शिंदे, माजी उपनगराध्यक्ष अमर मगर, पाळीकर पुजारी मंडळाचे विपिन शिंदे, भाजपचे तालुकाध्यक्ष आनंद कंदले, शिवसेनेचे श्याम पवार, माजी नगरसेवक औदुंबर कदम, रामचंद्र रोचकरी, राजेश शिंदे, लालासाहेब मगर, नबीचाचा शेख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अँड गिरीश शेटे गुरुनाथ बडूरे प्रफुल मस्के महाबळेश्वर तोडकरी विश्वनाथ शेटे अँड अंजली साबळे अस्मिता शेटे ज्योती बचाटे वैशाली धरणे, अमृता बचाटे, विजया शेटे, राजश्री धरणे, रेखाताई कोरे, सारीका बडूरे, हिराबाई उळेकर वैशाली बडूरे अभिषेक कोरे कैलास मस्के मनोज गवळी सचिन नाडापुडे सोमनाथ शेटे महादेव तोडकरी लक्ष्मण उळेकर अँड मंगेश नाडापुडे विवेक कोरे राजू धरणे राहुल साखरे महेश नडमने भारत कोप्पा नागेश लकशेट्टी लक्ष्मण साखरे अशोक शेटे विशाल शेटे नागनाथ गिराम विश्वनाथ स्वामी अक्षय आडसकर रवी शेरेकर आदी उपस्थित होते. प्रस्ताविक बडूरे यांनी केले. यावेळी जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मण साखरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच गरजू विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप व पाणपोई सुरू करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवशंकर जळकोटे यांनी केले.

## पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे इंटरनॅशनल सायन्स ओलिंपियाड पदक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात

आरंभ मराठी । धाराशिव

:पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे इंटरनॅशनल सायन्स ओलिंपियाड पदक वितरण सोहळा मोठ्या उत्साहामध्ये आयोजित करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल सायन्स ओलिंपियाड या स्पर्धा परीक्षेत ५५ विंद्यार्थ्यांना गोल्ड मेडल ऑफ एक्सलांस तर १० विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल ऑफ डिस्टिंक्शन मिळाले या कार्यक्रमासाठी पोदार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे, उप प्राचार्य निलेश जाधव, प्रशासकीय अधिकारी जीवन कुलकर्णी आदी मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य वाल्मिक यांच्या मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. यानंतर सर्व यशस्वी व विजेत्या विद्यार्थ्याचा पदक वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात पालकांनी ही उपस्थिती दर्शवली व विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यास व त्यांची प्रगती साधण्यात अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे मोलाचे योगदान आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, कर्मचारी वर्ग यांचे सहकार्य लाभले.



## आठवणी बापाच्या कविसंमेलन उत्साहात

आरंभ मराठी । धाराशिव

कै शिवाजी वनाबाई बाबुराव शेळके यांच्या ८९ व्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती यांच्या वतीने योगीराज माने यांच्या अध्यक्षतेखाली '' आठवणी बापाच्या कविसंमेलन'' आयोजित करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून गंगाखेड येथील गझलकार डॉ आत्माराम जाधव, अविनाश कासंडे, यशवंत मस्के यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक करताना साहित्य भारतीचे संयोजक युवराज नळे यांनी कै. शिवाजीराव शेळके यांच्या संदर्भातील काही आठवणी ताज्या करत सुरेश शेळके व रमेश शेळके यांनी आपल्या वडिलांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण व साहित्यिक उपक्रम राबविण्याचा संकल्प केला. याबद्दल त्यांचे कौतुक केले. या कविसंमेलनामध्ये बापावरील मनाला साद घालणाऱ्या विविध कविता व गझला सादर करण्यात आल्या. अनेक कवींनी खूप भावस्पर्शी रचना सादर केल्या.



यामध्ये कवी भागवत घेवारे यांनी

अलग राहिले संत विठ्ठला
वळवळ करती जंत विठ्ठला,
आई-बाबा वाटुन घेती,
याची वाटे खंत विठ्ठला

ही वर्तमान परिस्थिती दर्शवणारी कविता सादर करून समाजाला आरसा दाखविण्याचे काम केले. तसेच रवींद्र शिंदे यांनी

बाप म्हणे माझा पोरं उजेडात यावा,
माझ्या जगण्याचा ठसा
त्याच्यामधी उमटावा

या रचनेच्या माध्यमातून बापाची आपल्या मुलांविषयी असणारी त्यागी भावना दर्शविली. याच बरोबर अश्विनी धाट यांनी आपली रचना सादर करताना

डॉ.वळसंगकर म्हणाले, तुझं खरयं देवा,
एक डॉ. म्हणून मी खूप कणखर होतो,
पण माझ्यातला बाप हरुन गेला,
पुन्हा एकदा शिरीष नावाचा
नटसम्राट घडून गेला...

या रचनेच्या माध्यमातून नुकतेच निधन झालेले डॉ वळसंगकर यांच्या आठवणी जागृत केल्या.

निमंत्रित कवी म्हणून सुभाष चव्हाण, राजेंद्र अत्रे, स्नेहलता झरकर, डॉ अस्मिता बुरगुटे, बाळासाहेब मगर, कृष्णा साळुंखे, युसूफ सय्यद, अरविंद हंगरगेकर, बाळ पाटील, सुवर्णा शिनगारे, गणेश मगर या सर्वांनीच एकापेक्षा एक सरस कविता व गझला सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी कवयित्री सुवर्णा शिनगारे यांना जिल्हा स्तरावरील आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत पडवळ यांनी तर आभारप्रदर्शन अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती धाराशिवचे कार्यवाह रविंद्र शिंदे यांनी केले. शेळके परिवाराच्या वतीने सुरेश शेळके, रमेश शेळके, प्रज्ञा शेळके, वर्षा शेळके, कृष्णा शेळके यांनी निमंत्रित कवी व मान्यवरांचा सन्मान केला. एक आगळ्या वेगळ्या उपक्रमाने आपल्या बापाचे ऋण शब्दात व्यक्त करण्याचे आणि बाप काय असतो हे प्रत्येक व्यक्तींच्या भावनांना आपल्या शब्दात मांडण्याचे काम या आठवणी बापाच्या कविसंमेलन'' च्या माध्यमातून करण्यात आले.

## तलमोड येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात जगतज्योत्ती महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



आरंभ मराठी । उमरगा

उमरगा तालुक्यांतील तलमोड येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक विराज मोरे हे होते. महात्मा जगतज्योती बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे मुख्याध्यापक विराज मोरे व के.बी. माळी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी आपल्या भाषणातून महात्मा जगतज्योती बसवेश्वरांचे चरित्र विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.टी.वडदरे यांनी केले, आभार जे.जी.जाधव यांनी मानले.

## शांतीदूत परिवाराने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देवून केला गौरव

आरंभ मराठी । तुळजापूर

समाजातील उत्तम कार्य करणाऱ्यांचा गौरव म्हणजे त्यांच्या कार्याला प्रोत्साहन व चालना आहे. समाजात उत्तम कार्य करून इतरांना दिशा दाखविणे हे महान कार्य आहे. शांतीदूत परिवाराने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देवून केलेला गौरव हा प्रेरणादायी असुन येणाऱ्या काळात जोमाने कार्य करता यावे यासाठी बळ देणारा आहे असे मत उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी व्यक्त केले. शांतीदुत परिवाराच्या अध्यक्षा विद्याताई जाधव अध्यक्षस्थानी होत्या.



शांतिदूत परिवार महाराष्ट्रच्या वतीने २०२५ या वर्षाचे सेवारत्न पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते सोमवार (ता.२८) रोजी ओम लॉन्स येथे वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार प्रवीण स्वामी, शिवसेना उपनेत्या सौ.अस्मिता गायकवाड (सोलापूर), तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार , महाराष्ट्र राज्याचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव उपस्थित होते. डॉ. विठ्ठलराव जाधव यांनी प्रास्ताविक केले. ॲड. एस.पी.इनामदार यांनी सुत्रसंचलन केले. प्रा.युसुफ मुल्ला यांनी आभार मानले. प्रा. जिवन जाधव, पद्माकर मोरे, मनेश माणिकवार, संतोष जाधव, श्याम पाटील, जितेंद्र घोटाळे, महंमद रफिक शेख, संतोष जाधव, अभयकुमार हिरास, मधू चौधरी पुणे, संतोष मोहिते, नसीरुद्दीन शेख यांनी यासाठी पुढाकार घेतला. यावेळी महीला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यांचा झाला गौरव

कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मोहियोदिन सुलतान, माजी नगरसेवक विजय दळगडे, महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचे सह संचालक डॉ. तुकाराम मोटे, जकेकुरवाडीचे सरपंच अमर सूर्यवंशी, उद्योजक अनिल सगर, सुमित कोथिंबीरे, पोलिस निरीक्षक अश्विनी भोसले, मंजुषा चव्हाण, ॲड. दिलीप सगर, एसबीआय शाखा प्रबंधक शितल रासकर, अपर्णा पोद्दार, संजय रूपाजी, सुरेश माणिकवार, अशोक जाधव, किसन राठोड, अजय गायकवाड, शेखर आंबेकर, गोविंदराव गायकवाड.

---

## विविध वृत्त...

### तुळजापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणूक उत्साहात



आरंभ मराठी । तुळजापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमीत्त तुळजापूर येथे संघर्ष युवा प्रतिष्ठान भीमनगर येथील जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी या मिरवणूकीत डि जे, लेझर लाईट शो व भीम गीतांनी तुळजापूर नगरी मंत्र मुग्ध झाली. मिरवणूकीच्या उद्घाटनप्रसंगी मा. नगराध्यक्ष सचिन रोचकरी, आनंद कंदले, बच्चू शिंदे, तानाजी कदम, अरुण कदम, वैजिनाथ पांडागळे, सामाजिक कार्यकर्ते सागर कदम, किरण कदम मिरवणुक अध्यक्ष चेतन कदम,उपाध्यक्ष सुरज कदम, सचिव सोनू कदम, खजिनदार अनुज कदम, अक्षय कदम, राहूल सोनवणे, कमलेश कदम, रोहित कदम,आदित्य कदम,बल्ली कदम,रोहित पांडागळे,विनोद भालेकर,गोकुळ कदम,नितीन माने माजी नगर अध्यक्षा संगिता कदम,महिला प्रमुख अनिता कदम तसेच यावेळी तुळगापूर शहरातील महिला व पूरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### येणेगुर येथील कॅप्टन जोशी स्मारक विद्यालयात महात्मा बसवेश्वर यांना जयंतीनिमित्त अभिवादन



आरंभ मराठी । आलूर

उमरगा तालुक्यातील येणेगूर येथे येथे मंगळवारी १२ व्या शतकातील विविध जाती धर्मांना एकत्र करुन समता प्रस्थापित करणारे थोर समाज सुधारक जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन श्री परमहंस शिक्षण संस्थेचे संचालक शंकर हुळमजगे, प्रशालेचे मुख्याध्यापक महेश हरके, कोमल कीर्तने यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनाबद्दल गोपाळ गेडाम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संस्कृती विभाग प्रमुख गोपाळ गेडाम यांनी केले. या कार्यक्रमासाठी शिक्षक महेश खंडाळकर, अविनाश दुनगे, व्यंकट बिराजदार, प्रवीण स्वामी, चंद्रकांत बिराजदार, गोविंद मेंडिबणे, प्रदीप शिंदे, सौरभ उटगे, पार्वती जगताप, सुरेश जाधव, सुप्रिया झिंगाडे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### सोनारी येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुक्यातील सोनारी येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बसवेश्वर जयंती ही महात्मा बसवेश्वर यांच्या जन्मदिनी, म्हणजेच वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय्य तृतीया) या दिवशी साजरी केली जाते. बसवेश्वर हे बाराव्या शतकातील वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक, समाजसुधारक आणि महान तत्वज्ञ होते. त्यांनी जातीभेद, बालविवाह, स्त्री-पुरुष विषमता यांसारख्या सामाजिक अन्यायाविरोधात लढा दिला. यावेळी आदिनाथ गुळमिरे, शांतीलिंग गाढवे, रविंद्र गुळमिरे, भाऊसाहेब गुळमिरे, बाळासाहेब गुळमिरे, सचिन गाढवे, सागर गुळमिरे, अमर गाढवे, प्रविण गुळमिरे, सागर गाढवे, स्वप्निल गुळमिरे, संतोष गाढवे, शुभम गुळमिरे, दिलीप गुळमिरे, रामेश्वर कुंभार, हणमंत गाढवे, फंटोष गुळमिरे, आकाश तोडकरी, शिवाजी कारकर उपस्थित होते.

### नळदुर्ग येथे भगवान परशुराम यांची जयंती साजरी



आरंभ मराठी । नळदुर्ग

नळदुर्ग ब्राह्मण समाजाच्या वतीने भगवान परशुराम यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी समाजातील जेष्ठ मार्गदर्शक वसंतराव अहंकारी व उत्तमराव रामदासी यांच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष विनायक अहंकारी, सचिव मुकुंद नाईक उपाध्यक्ष प्रदीप ग्रामोपाध्य, सुहास पुराणिक,उमेश नाईक,सदानंद नाईक,राजकुमार वैद्य, प्रमोद कुलकर्णी,संतोष नाईक, सन्नी भूमकर, अजय देशपांडे, सौरभ रामदासी, गजानन कुलकर्णी, आशुतोष नाईक,प्रसन्ना कुलकर्णी, मयूर जोशी, सारंग जोशी यांच्यासह ब्राह्मण समाज मोठया संख्येने उपस्थित होता. यावेळी ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष विनायक अहंकारी व मुकुंद नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. तर आभार प्रदर्शन सूरज जोशी यांनी मानले.

# पैसे घेता मग सुविधा का देत नाहीत?

## ▪ येरमाळा बसस्थानकात प्रवाशांना पिण्यासाठी पाणी मिळेना
## ▪ पाण्याच्या टाकीवर उगवली झाडे ▪ रात्रीच्या वेळी चौकशी कक्ष बंद

दैनिक आरंभ मराठी SPECIAL

**सोमनाथ बारकुल । आरंभ मराठी**

**येरमाळा : दरवर्षी प्रवासी भाड्यात वाढ करणारे राज्य परिवहन महामंडळ प्रवाशांच्या सुविधा मात्र वर्षागणिक कमी करत आहे. त्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात पैसे वसूल करणाऱ्या महामंडळाने किमान मूलभूत सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे. कळंब तालुक्यातील येरमाळा येथील बसस्थानकात प्रवाशांना पिण्यासाठी पाणी नाही, शौचालय नाही तसेच रात्रीच्या वेळी चौकशी कक्ष देखील बंद असते,त्यामुळे प्रवाशांना लुटणाऱ्या महामंडळाच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

धुळे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर तसेच खामगाव – पंढरपूर राज्य महामार्गावर असलेल्या येरमाळा येथील बस स्थानकावरून दररोज शेकडो बस धावतात. त्यामुळे बसस्थानकात प्रवाशांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. रात्रीच्या वेळी उशिरापर्यंत प्रवाशांना बसची प्रतीक्षा करत स्थानकात थांबावे लागते. मात्र, या प्रवाशांना साध्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. स्थानकात समस्यांनी अक्षरशः विळखा घातला आहे. यात भर म्हणजे बसस्थानकामध्ये रात्री– अपरात्री शेकडो प्रवासी असतात. परंतु चौकशी कक्ष बंद असल्याने बसेस महामार्गावरुनच निघून जात असल्याने प्रवाशांच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. येरमाळा हे गाव सोलापुर–धुळे व कोल्हापुर–नागपुर या महामार्गावरील मुख्य ठिकाण असून, या बसस्थानकामध्ये दैनंदिन ३५० ते ४०० बसेस ये–जा करतात. येरमाळ्यातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी महामार्ग व आराध्यदैवत येडेश्वरी देवीचे मंदीर असल्याने प्रवाशासह भाविकांची येरमाळ्यात हजारोची गर्दी असते. मात्र येरमाळा बसस्थानकामध्ये प्रवासी तथा भाविकांना कसल्याच प्रकारच्या सुविधा मिळत नाहीत. बसेसची माहीती मिळत नसल्याने प्रवाशांना उघड्यावरच रात्रभर बसून, झोपुन स्वत:ची काळजी घेत रात्र काढावी लागते. मात्र रात्रीच्या वेळी चौकशी कक्ष बंद असल्याने बस देखील बसस्थानकामध्ये येत नाहीत. तर आलेल्या बस दरवाजा उघत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.याच बरोबर बसस्थानकामध्ये रात्रीच्या वेळी चौकशी कक्ष बंद असल्याने प्रवाशांना भुरट्या चोरासह मारहाणीच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागत आहे. एस.टी .महामंडाळाने याकडे लक्ष देऊन रात्रीच्या वेळी चौकशी कशी कक्ष सुरु करावा, अशी मागणी भाविक, प्रवाशांकडून केली जात आहे.



### पाण्याचा ठणठणाट

देवीचा यात्रा उत्सव असल्याने आम्ही देवीचे दर्शन घेण्यासाठी आलो होतो.दर्शनाला गर्दी जात असल्याने बसस्थानकामध्ये येण्यास उशिर झाला. येथे आलो तर चौकशी कक्ष बंद असल्याने आम्हाला नगरला जाण्यासाठी कसे जायचे हे समजले नाही, त्यामुळे आम्ही रात्रभर मुलाबाळासह जीवमुठीत घेऊन रात्र काढुन सकाळी निघालो. पण रात्रभर बसस्थानकामध्ये भीतीचे वातारण होते.

**–सुरज भालेराव**
**उल्हासनगर, मुंबई**

### ४० रुपये मोजून पाणी घेतले

आम्ही सर्व सोनारी येथील यात्रेकडुन गावाकडे जाण्यासाठी येरमाळ्यामध्ये पण आमच्या गावाला गाडी कधी मिळेल याची खात्री करण्यासाठी गेलो तर बसस्थानकामध्ये कोणीही नव्हते तसेच बसस्थानकामध्ये रात्रीच्या वेळी अंधार पसरला होता. शौचालयही बंद होते.पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने आम्हाला पिण्याच्या पाण्याच्या बाटलीसाठी ४० मोजावे लागले. एसटीवाले एवढे पैसे घेतात.मात्र, सोयी–सुविधा काहीच देत नाहीत.

**–ओमकार भागवत,**
**गांधीनगर, लातूर**



# राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे जल्लोषात स्वागत

**आरंभ मराठी । धाराशिव**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या ६५ व्या वर्षाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे बुधवारी शहरात आगमन झाले. यावेळी यात्रेचे शहरात उत्स्फूर्त आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून या यात्रेला सुरुवात झाली. धाराशिव शहरात यात्रेच्या स्वागताप्रसंगी राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक, ख्वाजा शमशोद्दीन गाजी दर्गा, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि श्री संत गोरोबाकाका मंदिर या पवित्र ठिकाणांहून माती आणि जल घेऊन यात्रेचे पुढील मार्गासाठी






प्रस्थान करण्यात आले.यावेळी बोलताना आमदार विक्रम काळे यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केवळ राजकारण करत नाही, तर सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा आणि शाहू–फुले–आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून आणि प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही यात्रा सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. आ. काळे हे यात्रेचे मराठवाडा समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. यात्रेला सर्वपक्षीय आणि सर्व समाजातील घटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे सांगून आ. काळे म्हणाले की, महाराष्ट्राच्या ६५ वर्षांच्या वाटचालीत कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव १ ते ५ मे दरम्यान मुंबईतील जांबोरी मैदान येथे होणाऱ्या गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवात करण्यात येणार आहे.

या स्वागत प्रसंगी आ. विक्रम काळे यांच्यासह प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, प्रदेश संघटक सचिव खलील पठाण, जिल्हा कार्याध्यक्ष समीयोदिन मशायक, शहराध्यक्ष सचिन तावडे, तालुकाध्यक्ष प्रशांत फंड, मनोज मुदगल, अकबर पठाण, सामाजिक न्याय प्रदेश सरचिटणीस सचिन सरवदे, ॲड. इंद्रजीत शिंदे, विशाल शिंगाडे, दिग्विजय शिंदे, अतुल जगताप, असद पठाण, सतीश घोडेराव, बालाजी वगरे, विवेक साळवे, महम्मद अबूबकर कोतवाल, बालाजी शिंदे, निहाल शेख, राजाभाऊ जानराव, अराफत काझी, सुजित बारकुल, प्रताप शिंदे, सौरभ देशमुख, दत्ता देशमुख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्या मंदिर येथे महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त अभिवादन

**आरंभ मराठी । उमरगा**

महात्मा बसवेश्वर हे सर्व सामान्याचे प्रतीक होते. आपल्या आयुष्यात त्यांनी जीवनभर सर्वधर्मसमभावाची शिकवण सर्व सामान्यांना दिली. समाजात समता, बंधुता व सुभत्ता नांदावी यासाठी त्यांनी स्वतःपासून सुरुवात केली. त्या काळात जातीव्यवस्थेचे प्रस्त सगळीकडे व्यापलेले असताना मानवाने सर्व मानव एक समान आहेत याची शिकवण ते देत राहिले. या कामांमध्ये त्यांना प्रस्थापिताकडून खूप त्रास सहन करावा लागला. मात्र याची तमा त्यांनी बाळगली नाही. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने महात्मा ठरले, असे प्रतिपादन सहशिक्षक व्यंकट वचने यांनी केले. बुधवारी (दि.३०) श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये महात्मा बसवेश्वर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी व्यंकट वचने प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक गोपाळ आष्टे हे होते. यावेळी मुख्याध्यापिका सविता लोहार, शशिकांत शिरोळे, उल्हास दूधभाते सह सर्व शिक्षक उपस्थित होते. अध्यक्षपदावरून बोलताना गोपाळ आष्टे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर सारख्या महान विचारवंतांना कोणत्या जातीच्या बंधनात अडकवून ठेवण्यापेक्षा समस्त मानव जातींनी त्यांच्या विचाराचा वारसा पुढे चालवावा. बसवेश्वरांनी घालून दिलेल्या विचारावर समाजाची वाटचाल झाली, तर निश्चितच समाजात शांतता ,बंधुभाव, एकात्मता, आर्थिक सुबत्ता वाढेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल पतंगे यांनी तर आभार शशिकांत शिरोळे यांनी मानले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम

**आरंभ मराठी । तुळजापूर**

बौध्दीसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर महात्मा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) युवक आघाडीचे तालुका सरचिटणीस शुभम कदम यांच्या वतीने तुळजापूर येथील गोरगरीब पारधी समाज बांधवांच्या कुटूंबांना किराणा किटचे वाटप करून जयंती साजरी करण्यात आली. तसेच रिपाइंचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे, जनहित संघटनेचे अजय साळुंके, दयावान नागरी सहकारी पतसंस्थेचे नवनिर्वाचित चेअरमन प्रशांत कदम सोंजी, व्हाईस चेअरमन वैजिनाथ पुजारी संचालक युवराज साठे यांचा निवडीनिमित्त सत्कार करण्यात आला.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे, महाराष्ट्र जॉईंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ, मराठवाडा प्रदेश कार्याध्यक्ष आनंद पांडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजापूर तालुका युवक आघाडीचे तालुका सरचिटणीस शुभम कदम यांच्या वतीने बुधवारी (दि३०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात पारधी समाज बांधवांच्या कुटूंबांना ५० किराणा किटचे नवनिर्वाचित पदाधिकारी यांच्या सत्काराचे आयोजन करुन मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

डॉ आंबेडकर यांच्या जयंती विचारांची जयंती व्हावी दिन दुबळ्यांच्या उध्दाराची जयंती व्हावी या संकल्पनेतून जयंतीनिमित्त दरवर्षी वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येते.यापूर्वी निराधार महिलांना साड्या वाटप, शालेय साहित्य वाटप, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत असे सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येत यंदा पारधी समाज बांधवांना किराणा किटचे वाटप करून जयंती साजरी करण्यात आली आहे.

याप्रसंगी रिपाई मराठवाडा प्रदेश कार्याध्यक्ष आनंद पांडागळे,युवक तालुका सरचिटणीस शुभम कदम,जिल्हा नेते प्रताप कदम, तालुकाध्यक्ष बाबासाहेब मस्के,अडॅ.अदित्य कदम, विशाल साळुंके, संतोष भोरे, लक्ष्मण नंन्नवरे, सचिन यादव,अमित जाधव,हणमंत क्षीरसागर,अमोल गायकवाड,महेश क्षीरसागर,बाबुराव सुर्यवंशी, अविनाश पवार, संदीप अंकुशराव, दत्तू गवळी,रमेश गायकवाड,विजय गायकवाड,महादू सोनवणे,कुमार चौधरी,उमेश जानराव,मुकेश चौधरी विजय पवार आदींसह भीम अनुयायी उपस्थित होते.

# नळदुर्ग किल्ल्याला अतिक्रमणाचा वेढा, ३ मेपर्यंत अतिक्रमण न हटवल्यास कारवाई

**पुरातत्व विभागाच्या निर्देशानंतर ८७ जणांना नगर पालिकेकडून नोटीस**

**आरंभ मराठी । नळदुर्ग**

सहाय्यक संचालक पुरातत्त्व विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेल्या नळदुर्ग किल्ल्याच्या आतील व प्रवेश द्वारासमोरील अतिक्रमणधारकांच्या यादीनुसार संबंधित अतिक्रमण धारकांनी ३ मे पर्यंत अतिक्रमण काढुन घ्यावे अन्यथा प्रशासनामार्फत अतिक्रमण निष्कासित करण्यात येईल,अशी नोटीस नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने संबंधित अतिक्रमण धारकांना बजावण्यात आली आहे. यामध्ये किल्ल्याच्या आतमधील ३० तर बाहेरील ८७ जणांना ही नोटीस बजावण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार राज्यातील गड किल्ल्यांच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणे, वास्तुच्या सौंदर्यास / सम्यतेस /पवित्र्यास बाधा पोहचणे इत्यादी बाबी संभावित असल्याने गड किल्ल्यावरील अतिक्रमणे दुर करण्यासाठी व पुन्हा त्याठिकाणी



अतिक्रमण होऊ नये याकरीता शासनातर्फे जिल्ह्याचे जिल्हाधिका–यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुषंगाने २७ जानेवारी व ९ एप्रिल रोजी नळदुर्ग किल्ल्याच्या प्रवेश द्वारासमोरील व किल्ल्याच्या आतील अतिक्रमण निष्कासित करणेबाबत जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत नळदुर्ग किल्ल्याच्या प्रवेश द्वारासमोरील व किल्ल्यातील अतिक्रमण धारकांच्या संयुक्त सर्वेक्षण करून यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते.जिल्हाधिकारी धाराशिव व सहाय्यक संचालक (पुरातत्व) विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी नळदुर्ग किल्ल्याच्या प्रवेश द्वारासमोरील अतिक्रमणांची उपलब्ध करुन दिलेल्या यादीनुसार अतिक्रमण निष्कासित करण्याची कारवाई संदर्भीय आदेश मिळाल्यापासुन ८ दिवसात पुर्ण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी धाराशिव यांना आदेश देण्यात आले आहेत.या आदेशाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी यांनी सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत प्राप्त यादीमधील अतिक्रमण धारकांना नोटीस बजावण्यासाठी मुख्याधिकारी नगर परीषद नळदुर्ग यांना निर्देश देण्यात आले. त्यानुसार मुख्याधिकाऱ्यांनी नळदुर्ग किल्ल्याच्या आतील व किल्ल्याच्या प्रवेश द्वारासमोरील भागात अतिक्रमण करुन बांधण्यात आलेले अतिक्रमण ३ मे २०२५ पर्यंत आपण स्वताहुन काढुन घ्यावे अन्यथा प्रशासनामार्फत हे सर्व अतिक्रमण निष्कासित करण्यात येईल. त्याचबरोबर अतिक्रमण काढण्याचा सर्व खर्च आपणाकडुन वसुल करण्यात येईल याबाबतची नोटीस नळदुर्ग नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित अतिक्रमण धारकांना बजावली आहे. यामध्ये किल्ल्याच्या आतील ३० तर किल्ल्याच्या प्रवेश द्वारा समोरील ८७ अतिक्रमण धारकांना नोटीस बजावण्यात आली आहे.

## संगम कलेचा, सन्मान संस्कृतीचा गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ अंतर्गत

# उमरग्यात महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे जंगी स्वागत

**राष्ट्रवादी पक्षाच्या उपक्रमाचे कौतुक**

**आरंभ मराठी । उमरगा**

गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित महाराष्ट्र गौरव रथयात्रा मराठवाडा विभागातील धाराशिव जिल्ह्यातील उमरगा चौरस्त्यावर मंगळवारी (ता.२९) रोजी दाखल झाली असता, उमरगा लोहारा तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भव्य स्वागत केले. महाराष्ट्र राज्याला ६५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गड किल्ल्यांची माती व पवित्र नद्यांचे पाणी एकत्रित करीत समारोपीय समारंभ भव्य दिव्य पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. त्याच अनुषंगाने या रथयात्रेच्या निमित्ताने झालेल्या स्वागत सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिक्षक आमदार तथा रथयात्रा समन्वयक विक्रम काळे यांनी भूषवले. तर प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार यांचे यावेळी विशेष मार्गदर्शन लाभले. सुरेश बिराजदार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि अभिमानास्पद इतिहास देशासमोर मांडण्यासाठी ही रथयात्रा एक प्रभावी माध्यम ठरत आहे. गौरवशाली





महाराष्ट्र ही संकल्पना फक्त शब्दांत न राहता कृतीत उतरवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सदैव पुढे असतो. उमरगा लोहारा येथील कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून समाधान वाटते. हा महाराष्ट्राचा गौरव सर्वदूर पोहोचवणारा उपक्रम ठरेल.'' तर रथयात्रा समन्वयक शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी बोलताना सांगितले की, ''ही रथयात्रा केवळ एक राजकीय उपक्रम नसून ती महाराष्ट्राच्या शौर्य, परंपरा आणि सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहे. यातून ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये इतिहासाची जाणीव निर्माण करणे, सांस्कृतिक एकात्मता वृद्धिंगत करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. ही यात्रा सर्व जिल्ह्यांमध्ये पोहोचून युवकांमध्ये प्रेरणा निर्माण करत आहे.'' या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोहारा तालुकाध्यक्ष सुनील साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन अमोल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन उमरगा तालुकाध्यक्ष बाबा जाफरी यांनी केले. या स्वागत सोहळ्याला प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, तसेच शमशोद्दीन जमादार, अमोल पाटील आणि अनेक स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोगस काम करून बील उचलणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची सिरसाव ग्रामस्थांची मागणी

**आरंभ मराठी । परंडा**

सिरसाव गावाचे ग्रामदैवत असणाऱ्या महालक्ष्मी मंदिर व जिल्हा परिषद शाळेतील आरो प्लांटचे काम बोगस दर्जाचे करून प्रशासनातील काही अधिकाऱ्याला हाताशी धरून सुमारे साडेचार लाखाची रक्कम लाटणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी सिरसाव येथील ग्रामस्थांनी केली आहे. सिरसाव गावातील सामाजिक कार्यकर्ते आनंद जाधव व शिवसेना नेते श्रीगणेश चोबे यांनी ही तक्रार केली आहे.

या कामाला पंधराव्या वित्त आयोगातून मंजुरी मिळाली होती, ग्रामस्थांना व शाळकरी मुलांना चांगल्या पाण्याची सोय



व्हावी यासाठी पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने निविदा प्रक्रिया काढून हे काम करण्यात आले आहे.

परंतु जलशुद्धीकरण यंत्र न बसवता काम पूर्ण झालेला फलक मात्र लावलेला आहे. या गैरप्रकाराची कसून चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने अडचणीचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणाचा लवकरात लवकर छडा न लावल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. यावेळी आनंत जाधव, श्रीगणेश चोबे, गजानन पाटील, पांडुरंग चोबे, रामेश्वर चोबे यांच्यासह अन्य ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.